ePaper

# महामानवाला अभिवादनासाठी जनसागर लोटाला!



| वर्ष - 7 । अंक - 325 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 15 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- कोलकाताचा ऐतिहासिक विजय!
- काजोलचा व्हिडीओ व्हायरल
- भाजपाच्या जाहीरनाम्यावर टीका
- बहुमत मिळाले तर आरक्षण रद्द?


# यंदाचा मार्च आजवरचा सर्वात उष्ण!

## » जमीन आणि समुद्रावरील तापमान 1.35 अंश सेल्सिअसने जास्त नोंदवले गेले

। पुणे । महाईन्यूज

**यंदाचा मार्च महिना १७५ वर्षांच्या हवामानाच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण मार्च ठरला आहे. जगभरात मार्च महिन्यात जमीन आणि समुद्रावरील तापमान सरासरीपेक्षा १.३५ अंश सेल्सिअसने जास्त नोंदवले गेले आहे.**

अमेरिकेतील नॅशनल ओशनिक अँड अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशनने (नोआ) दिलेल्या माहितीनुसार, यंदाचा मार्च महिना १७५ वर्षांच्या हवामानविषयक नोंदीच्या इतिहासातील सर्वांत उष्ण मार्च माहिना ठरला आहे. मार्च महिन्यांत जगाचे सरासरी तापमान १२.७ अंश सेल्सिअस असते, त्या तुलनेत यंदाच्या मार्चमध्ये १.३५ अंश सेल्सिअस इतक्या जास्त तापमानाची नोंद झाली आहे.

मार्चमधील तापमानाने गेल्या दहा महिन्यांतील उच्चांक गाठला. मार्चमध्ये आफ्रिका, दक्षिण अमेरिकेत तापमान सरासरीपेक्षा जास्त राहिले, त्या तुलनेत युरोपात तापमान वाढ कमी होती. उत्तर अमेरिका, मध्य आशिया, उत्तर ऑस्ट्रेलियामध्ये तापमान सरासरीपेक्षा कमी राहिले.

मार्चमध्ये पृथ्वीवरील बर्फाचे आच्छादनही कमी दिसून आले. हवामानविषयक नोंदीनुसार यंदा आठव्या क्रमांकाचे सर्वांत कमी बर्फाच्छादन होते. युरोप आणि अमेरिकेतील बर्फाच्छादित भाग सरासरीपेक्षा कमी दिसून आला. तसेच समुद्रातील बर्फाचे प्रमाणही कमी होते. आर्क्टिक समुद्रातील बर्फाचा विस्तार सरासरीपेक्षा ६० लाख चौरस किमीने कमी होता. अंटार्क्टिकावरील बर्फाचा विस्तार खूपच कमी म्हणजे ३ लाख ५० हजार चौरस किमीने कमी दिसून आला.



### भारतातही सरासरीपेक्षा कमी तापमान

» यंदा मार्चमध्ये दक्षिण भारतातील तापमान सरासरीपेक्षा जास्त होते, त्या तुलनेत उत्तर भारतातील तापमान सरासरीपेक्षा कमी राहिले. हिमालयात सातत्याने थंड हवेचे पश्चिमी वाऱ्याचे झंझावात सक्रिय राहिल्यामुळे उत्तर भारतात तापमान सरासरीपेक्षा कमी नोंदविले गेले आहे. जगाचा विचार करता, वायव्य ऑस्ट्रेलियाला नेव्हिल, हिंदी महासागरात फिलिपो आणि उत्तर ऑस्ट्रेलियाला मेगन, या चक्रीवादळांचा तडाखा बसला.

### 122 वर्षांमधील सर्वाधिक उष्ण महिना

» मार्च महिन्यातील तापमानाने मागील सर्व विक्रम मोडले आहेत, मार्च १९०१ पासून १२२ वर्षांतील हा भारतातील सर्वात उष्ण मार्च ठरला आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) ही माहिती दिली. मार्च २०२२ ची मासिक सरासरी ३३.१ डिग्री सेल्सियस आहे. जी २०२१ मधील ३३.०९ डिग्री सेल्सियसचा मागील विक्रम मोडीत काढते, असे हवामान विभागाने म्हटले आहे. दीर्घकाळापर्यंत दुष्काळामुळे वायव्य भारतात उष्ण हवामान निर्माण झाले आहे. गुरुवारी दिल्लीच्या काही भागांमध्ये तीव्र उष्मा होता, तीन ठिकाणी कमाल तापमान ४१ अंशांच्या पुढे गेले, असे अधिकाऱ्यांनी पुढे सांगितले. ३ ते ६ एप्रिल दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. देशातील बहुतांश भागात उष्णतेने लोक हैराण झाले आहेत. लोक घरातून आणि कार्यालयातून बाहेर पडणे टाळत आहेत. देशभरातील तापमानही यंदाच्या उन्हाळ्यात सरासरीपेक्षा अधिक असणार आहे. यासाठी 'ला निना'च्या स्थितीचा अभाव कारणीभूत ठरू शकते. 'ला निना' स्थितीमध्ये पॅसिफिक महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान ओसरते तर 'अल निनो' स्थितीमध्ये हे तापमान वाढते. लवकरच 'ला निना'चा प्रभाव होणार आहे. त्यामुळे समुद्राचे तापमान वाढेल; मात्र 'अल निनो' निर्माण होणार नाही. तटस्थ 'ला निना'मुळे उन्हाळ्यात देशभरातील किमान व कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहणार असल्याचे मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच सांगण्यात आले होते.

# संविधानवादी, कार्यकर्ता मतपेटीतला निर्णय सजगतेने घेईल!

## » सुषमा अंधारे : पिंपरी, चिंचवडमध्ये जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन..!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर मनुवादी विचारसरणीचा विरोधात त्यांनी जी लढाई लढली. त्या लढाईसाठी त्यांनी सांगितलेल्या एकमेव निशस्त्र क्रांतीचा मार्ग असलेल्या मतपेटीतून मानवतावादी व संविधानवादी कार्यकर्ता या निवडणुकीत सजगतेने निर्णय घेईल, असे मत शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी मांडले.**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिवसेना नेत्या सुषमा अंधारे आणि मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यावेळी माध्यमांशी त्या बोलत होत्या. या प्रसंगी त्यांच्या समवेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, जिल्हाप्रमुख माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे, मावळ लोकसभा प्रचार प्रमुख योगेश बाबर, स्वराज इंडियाचे नेते मानव कांबळे, आम आदमी पार्टीचे पदवीधर प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, इंजी. देवेंद्र तायडे, रोमी संधू, प्रतापराव गुरव, अमीन शेख, संतोष म्हात्रे, विशाल जाधव, संभाजी ब्रिगेडचे शहरअध्यक्ष प्रवीण कदम, तुषार नवले, सचिन चिंचवडे, कॉंग्रेसचे उपाध्यक्ष विश्वनाथ जगताप, नरेंद्र बनसोडे, यांच्यासह सर्व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "भ्रष्टाचारी व परिवारवादावर मोठ्या गप्पा या निवडणुकीत भाजप मारत आहे. पण, जितका मोठा भ्रष्टाचारी, तितका मोठा त्याचा प्रवेश भाजपमध्ये होतो. परिवारावादावर बोलताना त्यांनी दिलेले उमेदवार पाहिले पाहिजेत. यापूर्वी ज्या घोषणा केल्या. आश्वासने दिली. त्याची पुर्तता त्यांना करता आलेली नाही. इंदू मिल येथील बाबासाहेबांच्या स्मारकाचे काय झाले? दोन कोटी रोजगार निर्मितीच, महागाई कमी करण्याचे दिलेल्या आश्वासनाचे काय झाले ? याचे उत्तर मतदारांना द्यावे आणि नंतर त्यांनी नव्या संकल्प पत्रावर बोलावे. आश्वासने देऊन ती न पाळणे ही भाजपची पध्दत झालेली आहे. जनता आता त्यांच्या अशा प्रचाराला भुलणार नाही.
>
> -सुषमा अंधारे

# बोलायला गेलो तर खुप काही निघेल!

## सुप्रिया सुळेंना मुरलीधर मोहोळांनी दिलं प्रत्युत्तर

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या घराबाहेरी गोळीबार घटनावरून अब की बार गोळीबार सरकार असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी सरकारवर जोरदार टिका केली. याशिवाय सुप्रिया सुळे यांनी पुण्यातील गुंडागिरीच्या घटनेवरूनही सरकारला चांगलचं सुनावलं.**





यावरून आता महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी सुप्रिया सुळे यांना प्रत्युत्तर दिलंय. यावेळी मोहोळ म्हणाले की, सुप्रियाताई माझ्यापेक्षा मोठ्या आहेत. पण मी ताईंना आठवण करून देतो की, जेव्हा त्यांची राज्यात आणि देशात सत्ता होती. तेव्हा त्यांच्या सरकारने शेतकऱ्यांवर गोळीबार केला होता. शेतकऱ्यांचा जीव घेतला होता. तसं तरी आम्ही काहीही केलेलं नाही. बोलायला गेलो तर खुप काही निघेल. परंतु आम्ही वैयक्तिक बोलत नाही. असे मोहोळांनी म्हटलं.सुप्रिया सुळे यांच्यासह रवींद्र धंगेकर यांनी देखील यावरून टिका केली. शेतकऱ्यांवर गोळीबार झाला तेव्हा पालकमंत्री अजित पवार होते. त्यामुळे मोहोळ यांनी अजितदादांना प्रश्न विचारावा यावरून पुण्यातील दोन्ही उमेदवार आमनेसामने आलेत. दरम्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सत्ताधारी भाजपकडून राज्यघटना बदलण्याचे काम सुरू असल्याचे टीका केली होती. सुळे यांच्या टीकेचा देखील मुरलीधर मोहोळ यांनी समाचार घेतला.

### विरोधकांनी राजकारण सरळ करावं

“संविधान बदलण्याची विरोधकांची टीका ही धादांत खोटी असून ते केवळ खोटं बोलण्याचा काम करत आहेत. बाबासाहेबांच्या स्मृती जपण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील महायुती सरकारने केलं. इंदू मिल स्मारक असो की लंडनमधील घर हे आमच्या सरकारने केलं आहे. विरोधकांनी राजकारण सरळ करावं, खोटं बोलून अफवा पसरवण्याचा प्रयत्न करू नये” अशी टीका मोहोळ यांनी केलीय.

# मी केलेल्या कामांवरच कोल्हे निवडून आलेत, नाहीतर..!

## आढळरावांचा अमोल कोल्हेंवर घणाघात

।पुणे।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरुर मतदारसंघात एकमेकांवर जोरदार टीका-टिपण्णी सुरु आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने आढळराव पाटील पुणे स्टेशन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.**




यावेळी बोलताना महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी त्याचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांच्यावर सडकून टीका केली आहे.“डॉ. अमोल कोल्हे यांनी जुन्नर तालुक्यातील कोपरे मांडव हे गाव दत्तक घेतलं होतं. त्या गावातही आमच्या कार्यकर्त्यांनी स्वखर्चाने पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. त्यांना स्वतःचं काहीही दिसत नाही, स्वतःचा तालुका, त्यांनी दत्तक घेतलेल्या गावातही त्यांनी काही केलं नाही आणि ते राज्याचं काय सांगत आहेत. कोल्हेंच्या जाहिरनाम्यात मी केलेली विकास कामे असून, माझ्या कामावरच कोल्हे निवडून आले, तर मतदारसंघातील कोल्हेंची कामेदेखील मलाच करावी लागतात”, असं म्हणत आढळराव पाटलांनी कोल्हेंवर निशाणा साधला आहे..

### खासदार नसताना देखील काम

“जे प्रकल्प ५ वर्षापूर्वी होते ते देखील आत्ता आहे त्याच परिस्थितीत आहेत. लोक सकाळपासून मला त्यांच्या अडीअडचणी सांगत असतात. मी खासदार नसताना देखील काम करत आहे. कोल्हे यांचं कर्तव्यदेखील मलाच पार पाडाव लागत आहेत”, असंही आढळराव पाटील म्हणाले आहेत.“शिरूर मतदारसंघातील जनतेचा माझ्यावर विश्वास असून २०१४ च्या निवडणुकीपेक्षा यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ३ ते साडे ३ लाख मतांचं लीड मला मिळणार आहे. तसेच हडपसर मतदार संघातून कमीत कमी १ लाख मतांचं लीड मला मिळेल” असा विश्वास शिवाजीराव आढळराव पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# ... अन् शरद पवारांच्या ‘त्या’ विधानावर सुनेत्रा पवारांनी हातच जोडले !



।पुणे ।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघ लक्षवेधी ठरला असून यंदा प्रथमच अजित पवार गट विरुद्ध शरद पवार गट हे मतदारसंघात आमने सामने आले आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे या मतदारसंघातून लढणार आहेत. यामुळे राज्यातील जनतेचं या मतदारसंघाकडे लक्ष लागून राहिले आहे. या सर्व घडामोडी दरम्यान आज पुणे लोकसभा मतदार संघाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ,शिरुर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि बारामती लोकसभा मतदार संघाच्या उमेदवार सुनेत्रा पवार या तीन ही पुणे जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवारानी मार्केटयार्ड येथे फळभाज्या विक्री करण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. तसेच यावेळी सुनेत्रा पवार यांच्या गाण्याचे लॉंचिग झाले. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांच्याशी संवाद देखील साधला.

मागील आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पत्रकाराशी संवाद साधताना मूळ पवार आणि बाहेरून आलेले पवार यांच्यात फरक आहे असे विधान करीत सुनेत्रा पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला होता. त्या विधानावरून राजकीय वर्तुळात अनेक आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे.

# मतदानाचा टक्का वाढविण्याचे आव्हान!

## सोशल मीडियासह थेट मतदारांपर्यंत जाऊन मतदान करण्याबाबत जनजागृती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघात आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त ६० टक्क्यांपर्यंतच मतदान झाले आहे. त्यामुळे, यंदाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे मोठे आव्हान निवडणूक विभागासमोर आहे. त्यासाठी सोशल मीडियासह थेट मतदारांपर्यंत जाऊन मतदान करण्याबाबत आवाहन केले जात आहे. मतदारांना शपथ दिली जात आहे. नवोदित मतदारांना ओळखपत्र देऊन मार्गदर्शनही केले जात आहे.**

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर २००८ मध्ये मावळ व शिरूर लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी व चिंचवड आणि शेजारील मावळ विधानसभा मतदारसंघाचा समावेश मावळ लोकसभा; तर भोसरी विधानसभा मतदारसंघाचा समावेश शिरूर लोकसभा मतदारसंघात झाला. मात्र, ताथवडे गाव आणि लगतच्या हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांभे या गावांचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात आहे. मतदारसंघ पुनर्रचनेनंतरची पहिली लोकसभा निवडणूक २००९ मध्ये झाली. आतापर्यंत तीन निवडणुका झाल्या असून सध्या सुरू असलेली ही चौथी निवडणूक आहे. यापूर्वीच्या तीनही निवडणुकांत ६०.११ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेले नाही. या निवडणुकीत मतांची ही टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक विभाग विविध उपक्रम राबवित आहे.



### मतदान करण्याबाबत शपथ

» 'आम्ही सर्वजण, लोकशाहीप्रति जागृत करण्याच्यादृष्टीने, आपल्या देशाच्याप्रति प्रतिज्ञा करतो की, आम्ही मुक्त, निष्पक्षपणे व शांततेने आगामी लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान करू. त्यासाठी वंश, जात, समुदाय भाषा व इतर कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता, आम्ही निर्भीडपणे मतदानाचा हक्क बजावण्याची शपथ घेत आहोत,' अशी शपथ मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदारांना दिली जात आहे.

> मतदान करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. ती व्यवस्थित पार पाडता यावी, यासाठी सर्वांनी कसून प्रयत्न करावेत. निवडणूक विभागातर्फे विशेष प्रयत्न केले जात आहेत. मतदारांमध्ये जागृती केली जात आहे. निवडणूक यंत्रणेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर टपाली मतदानाची सोय असेल.
>
> **- डॉ. दीपक सिंगला,**
> निवडणूक निर्णय अधिकारी, मावळ लोकसभा

### मतदानाच्या दिवशी सुट्टी : दिवसे

» लोकसभा निवडणूक मतदानाच्या दिवशी संपूर्ण मतदारसंघात राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात सात मे रोजी (ताथवडे, हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांबे आदी गावे); मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या त्या दिवशी मतदारसंघात सुट्टी दिली आहे. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी मतदारसंघांच्या बाहेर असतील, त्यांना देखील लागू असेल. तसेच राज्य व केंद्र सरकारची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम व इतर संस्था (प्रतिष्ठान) आदींना ही सुट्टी लागू राहील. या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी मतदान करून राष्ट्रीय कर्तव्य बजावावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

### निवडणूक विभागाकडून प्रयत्न

» पोलिस मुख्यालयात अधिकारी, कर्मचाऱ्यांना टपाली मतदानाचे आवाहन.
» स्वीप उपक्रमाद्वारे मतदार जागृती उपक्रम.
» मतदानाच्या दिवशी वृद्ध, अपंग, महिला यांचे मतदान त्वरेने होईल, याची दक्षता घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना.
» कंपन्या, महाविद्यालय, संस्था, मंडई, बाजारपेठांमध्ये जाऊन मतदान करण्याबाबत शपथ.
» मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट यंत्र हाताळणीबाबत प्रशिक्षण.
» मतदान केंद्रासह मतदानापूर्वीची, मतदानावेळीची आणि मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच्या तयारीबाबत प्रशिक्षण.
» नवोदित मतदारांपर्यंत जाऊन मतदान करण्याबाबत आवाहन.
» व्हॉट्सॲप व अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे मतदार जागृती.
» मतदार यादीतील नावाची तपासणी करण्याबाबत वोटर हेल्पलाइनची माहिती.
» नवोदित मतदारांना मतदान ओळखपत्रांचे (कार्ड) वाटप.
» मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी व्हीलचेअर, प्रसंगी वाहनांची व्यवस्था.

---

# 'आयटीयन्स'चा 'मोदी 3.0' साठी खासदार बारणे यांना पाठिंबा!

## पिंपळे सौदागरमधील आयटी इंजिनिअर्सचा श्रीरंग बारणेंना निवडून आणण्याचा निर्धार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत यासाठी पिंपळे सौदागर भागात राहणाऱ्या आयटी इंजिनियर्सनी कंबर कसली आहे. 'मोदी 3.0' या नावाचा ग्रुप स्थापन करून त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- आरपीआय-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारात स्वतःला झोकून दिले आहे.**



खासदार बारणे यांनी शुक्रवारी संध्याकाळी रहाटणी व पिंपळे सौदागर भागात प्रमुख पदाधिकारी व मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या. माजी नगरसेविका निर्मला कुटे यांच्या निवासस्थानी 'मोदी 3.0' या आयटी इंजिनियर्सच्या समूहाने बारणे यांची भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला. खासदार बारणे यांनी गेल्या दहा वर्षात मतदार संघामध्ये केलेल्या विविध विकास कामांची माहिती सर्व तरुणांना दिली. पुढील पाच वर्षातील कामाच्या नियोजनाबाबतही त्यांनी या तरुणांशी चर्चा केली. 'अब की बार, चार सौ पार', 'फिर एक बार, मोदी सरकार' च्या घोषणांनी त्यांनी परिसर दणाणून सोडला.

**बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन..**

रहाटणी येथील क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन खासदार बारणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी कार्यक्रमाचे मुख्य संयोजक अरुण चाबुकस्वार तसेच निर्मला कुटे, राकेश नखाते आदी उपस्थित होते. या बाल आनंद मेळाव्याचा निमित खासदार बारणे यांनी लहानग्यांसोबत काही आनंदाचे क्षण अनुभवले. खासदार बारणे यांनी रहाटणी भागातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यांच्या समवेत तानाजी बारणे, मयूर बारणे, धनंजय चिंचवडे, दीपक विष्णू गुजर, अंकुश कोळेकर, सुदर्शन देसले, प्रदीप दळवी, दिलीप कुसाळकर, कानिफनाथ तोडकर, शरद राणे, सागर खेडेकर, योगेश गोडांबे, कुणाल ओव्हाळ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते होते.

रहाटणी येथे हरेश तापकीर, राजू नखाते, प्रसाद नखाते, गोविंद नखाते, विश्वनाथ नखाते, दगडू नखाते, चंद्रकांत नखाते, सविता नखाते, अनिल नखाते, सतीश नखाते, राजू खांदवे, नीलेश नखाते, बाळासाहेब नखाते, हरिभाऊ नखाते, राकेश नखाते, गणेश शिवराम नखाते, मनोज नखाते, स्वप्नील नखाते, सविता खुळे, सुरेश गोडांबे, दत्तात्रय गोडांबे, नंदू गोडांबे, योगेश गोडांबे, हरीश रेलवानी, इनरव्हील क्लब ऑफ पुणे क्वीन्सचे अध्यक्ष अंजली दशरथी, माजी नगरसेवक कैलास थोपटे, कुणाल थोपटे, पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष संजय भिसे आदींच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली.

### बारणे यांच्या विक्रमी मताधिक्याचा निर्धार..


» माजी नगरसेवक सुरेश भोईर यांच्या चिंचवड केशवनगर येथील कार्यालयात झालेल्या बैठकीत खासदार बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला. त्यावेळी सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, नीलेश डोके, बाळासाहेब वाल्हेकर, विठ्ठल भोईर, गतीराम भोईर, रवींद्र प्रभुणे, सतीश बलकवडे, निवृत्ती गावडे, दत्ताराम भोईर, नारायण लांडगे, महेश बारसवडे, राहुल भोईर, खंडूशेठ चिंचवडे, कैलास गावडे, जयराम भोईर, शिवाजी देशमुख, दीपक भोईर, काळूराम गावडे, दत्तात्रय चिंचवडे, प्रमोद भोईर, भारत भोईर, सतीश पाटील, दिलीप भेगडे आधी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## भूमिका

**लोकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मुद्द्यांबाबतचे उद्देश आणि विचार यांची लिखित घोषणा. यासंदर्भात काही उदाहरणेही देता येतील. अमेरिकेचा १७७६ च्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा; १४-१५ ऑगस्ट १९४७ रोजी जवाहरलाल नेहरूंचे 'नियतीशी करार' हे भाषणलक्षात येणारी काही उदाहरणे आहेत.**

# माझे मत त्याच उमेदवाराला !



२४ जुलै १९९१ रोजी भारताच्या अर्थव्यवस्थेची दिशा बदलणारे संस्मरणीय भाषण करताना डॉ. मनमोहन सिंग यांनी "जिची वेळ आलेली असते अशा गोष्टीला पृथ्वीवरील कोणतीही शक्ती रोखू शकत नाही" हे व्हिक्टर ह्यूगो यांचे विधान उद्धृत केले होते. या ऊटी विधानांनी/भाषणांनी, नवीन राज्यकर्त्यांचा इरादा स्पष्ट केला होता. अर्थात एखादे विधान ते करणाऱ्याचा खरा हेतू लपवूदेखील शकते. खोटे नेते खोटी विधाने करतात. 'मी प्रत्येक भारतीयाच्या बँक खात्यात १५ लाख रुपये टाकेन', 'मी वर्षाला २ कोटी नोकऱ्या निर्माण करेन' आणि 'मी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करीन', अशी विधाने नरेंद्र मोदींना त्रासदायक ठरली. निवडणूक जुमला म्हणून या विधानांची खिल्ली उडवली गेली. राष्ट्रीय पातळीवर अस्तित्व असलेले भारतातील दोन प्रमुख राजकीय पक्ष म्हणजे काँग्रेस आणि भाजप. भाजपने ३० मार्च रोजी जाहीरनामा समिती स्थापन केली, तर काँग्रेसने ५ एप्रिल रोजी जाहीरनामा प्रसिद्ध केला. मला या स्तंभात या दोन्ही पक्षांच्या दोन जाहीरनाम्यांची तुलना करायची होती. परंतु सध्या केवळ काँग्रेसचाच जाहीरनामा उपलब्ध आहे. त्यामुळे वाचक आणि मतदारांनी या दोन्ही पक्षांच्या जाहीरनाम्यांची तुलना कोणत्या ठळक मुद्द्यांवर करावी, ते मी सांगू इच्छितो.काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की, 'आम्ही पुन:पुन्हा सांगतो की या अखंड प्रवासात भारतीय राज्यघटना हा आमचा एकमेव मार्गदर्शक आणि साथीदार राहील. भाजप राज्यघटनेचे पालन करणार की त्यात आमूलाग्र सुधारणा करणार हे जाणून घेण्याची जनतेला उत्सुकता आहे. एक देश, एक निवडणूक, समान नागरी संहिता; नागरिकत्व सुधारणा कायदा (आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान अंतर्गत) या आणि अशा इतर अस्थिर तसेच फूट पाडणाऱ्या विचारांच्या संदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या संसदीय लोकशाहीच्या वेस्टमिन्स्टर तत्त्वांचे आपण पालन करणार का, हे भाजपने स्पष्ट केले पाहिजे.काँग्रेसने आपले इरादे स्पष्ट केले आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार देशव्यापी सामाजिक-आर्थिक आणि जात जनगणना करेल. आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा उठवण्यासाठी घटनादुरुस्ती केली जाईल. सर्व जाती आणि समुदायांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी नोकऱ्यांमध्ये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये १० टक्के आरक्षण खुले केले जाईल. काँग्रेस रोजगार आणि शिक्षणातील विविधतेची दखल घेणारा आणि त्याला प्रोत्साहन देणारा एक आयोग स्थापन करेल. जेणेकरून न्याय या महत्त्वाच्या मुद्द्यावर दोन्ही पक्ष कुठे उभे आहेत हे लोकांना कळेल.भारतात धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक आहेत. काँग्रेसने म्हटले आहे की सर्व भारतीयांना मानवाधिकारांचा आनंद घेण्याचा समान हक्क आहे. या अधिकारांमध्ये कुणालाही त्याला हव्या त्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे. त्यात बहुसंख्यवाद किंवा हुकूमशाहीला स्थान नाही. बहुलतावाद आणि विविधता हे भारताचे मूलस्थान आहे. भाजपने काँग्रेसवर 'लांगूलचालन' केल्याचा आरोप केला आहे, हा त्यांच्या अल्पसंख्याकविरोधी सुपरिचित भूमिकेसंदर्भातला सांकेतिक शब्द आहे. नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा लागू करण्याचा आणि समान नागरी संहिता मंजूर करण्याच्या आपल्या निर्धाराची भाजप पुन्हा पुष्टी करेल का? धार्मिक श्रमशक्तीचा सहभाग दर कमी आणि प्रचंड बेरोजगारी (पदवीधरांमध्ये ४२ टक्के) यामुळे भारताचा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश कमी होत आहे. काँग्रेसने केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमधील ३० लाख रिक्त जागा भरण्याचे, प्रशिक्षणार्थी उमेदवारी अधिकार कायदा करण्याचे, नवीन रोजगार निर्माण करणाऱ्या कॉर्पोरेट्ससाठी रोजगारसंबंधित प्रोत्साहन योजना लागू करण्याचे आणि स्टार्टअपना प्रोत्साहन देण्यासाठी फंड ऑफ फंड योजना स्थापन करण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनांनी तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे. भाजपप्रणीत एनडीए सरकारकडे तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी कोणतीही ठोस योजना नाही; राजकीय पक्ष म्हणून भाजप अधिक आकर्षक योजना देऊ शकेल का?

## संपादकीय »

### मनसबदारच..

***सारे दिल्लीश्वरांच्या तालावर नाचण्यास तयार! असेच महाराष्ट्रातील बहुसंख्य नेत्यांचे नेहमी का होते, हा प्रश्न राज ठाकरे यांच्या राजकारणापेक्षा महत्त्वाचा..***

योगाचार्य, अर्थाचार्य असे बाबा रामदेव आणि त्यांचे उपयोगाचार्य बालकृष्ण यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर बिनशर्त माफी मागितली त्याच दिवशी नवे मराठी हिंदुहृदयसम्राट राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाचा बिनशर्त पाठिंबा केंद्रातील सत्ताधाऱ्यांस जाहीर केला हा केवळ योगायोग असला तरी या दोन भिन्न घटनांत दोन साम्यस्थळे आहेत. पहिले म्हणजे उभयतांची कृती ही बिनशर्त आहे. आणि दुसरे साम्य म्हणजे या दोघांसमोरही याखेरीज अन्य काहीही पर्याय नाही! बाबा रामदेव, बालकृष्णन यांच्याबाबत जे म्हणायचे ते 'लोकसत्ता'ने म्हटलेले आहे. त्यांच्यावर पुन्हा नव्याने भाष्य करण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे आकार, प्रभावक्षेत्र, परिणाम इत्यादी मुद्दे लक्षात घेता राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाबाबतही अशा भाष्याची गरज नव्हती.

जनता' या आंबेडकरी चळवळीच्या महत्त्वाच्या वृत्तपत्रासाठी बहुरूपे गावातील आदिवासी स्त्रियांनी एक एक आणा गोळा करून वर्गणी दिली होती. भिल्ल स्त्रियांच्या गाण्यांमध्ये डॉ. बाबासाहेबांचे संदर्भ येतात. यावरून या समाजामध्ये आंबेडकरी चळवळ किती रुजली होती.

# आदिवासी स्त्री आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर



सामाजिक प्रबोधनाच्या काळात भारतातील संपूर्ण सामाजिक संरचना ढवळून निघाली. भारतातील पारंपरिक सामाजिक वहिवाटी, प्रथा आणि परंपरा यांमध्ये बदल घडून आले. प्रबोधनाच्या या काळात वर्षानुवर्षे कोंडीत सापडलेल्या समूहांनी स्वत:ला मुक्त करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने दलित, आदिवासी आणि स्त्रियांचे लढे महत्त्वाचे आहेत. भारतातील आदिवासी आणि इंग्रजांचे प्रशासन व प्रशासकीय अधिकारी यांच्यामध्ये कायम संघर्ष होत असे, याची अनेक उदाहरणे आहेत. आदिवासी पुरुषांसोबत आदिवासी स्त्रियांनीही इंग्रजांचा प्रतिकार केला आहे. अम्बापानीच्या युद्धात भिल्ल आदिवासी स्त्रिया इंग्रजांच्या विरोधात लढल्याचे संदर्भ आहेत. इंग्रजांशी लढणारा आदिवासी समूह हा तत्कालीन सामाजिक चळवळींमध्येही भाग घेताना दिसतो. मुळातच जंगलात राहणारा आणि गावकीपासून लांब असलेला हा समूह होय. असे असले तरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी चळवळ यांच्याशी आदिवासींचा जवळचा संबंध आहे. त्यामध्ये विशेषत्वाने आदिवासी स्त्रियांशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणि आंबेडकरी चळवळीशी आदिवासी स्त्रियांचा असा हा संबंध दुहेरी स्वरूपाचा आहे. उन्नत समाजापासून लांब असलेला, आपल्या नैसर्गिक प्रथा-परंपरांना जपणारा आदिवासी समूह एतद्देशीय समाजाने चोर ठरवला आणि इंग्रजांनी गुन्हेगार. या दोन्ही प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आदिवासी स्त्रियांचा आंबेडकरी चळवळीतील सहभाग समजून घेणे गरजेचे आहे. तसेच भारतातील स्त्रीमुक्तीचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व आदिवासी स्त्रियांचा संबंध समजून घेणे आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदिवासी यांचा सर्वप्रथम संबंध १९२८ ला स्टार्ट कमिटीच्या माध्यमातून आला. अस्पृश्य व आदिवासी किंवा जंगलात राहणाऱ्या समूहाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण कायदे करण्यासाठी, सामाजिक स्तरावर अभ्यास करण्यासाठी ही समिती नेमली होती. या समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक सदस्य होते. या समितीवर काम करत असताना बाबासाहेबांनी अनेक ठिकाणी जाऊन अस्पृश्य आणि आदिवासी समूहांची प्रत्यक्ष पाहणी केली. याच समितीचा एक भाग म्हणून एक प्रश्नावली तयार केली गेली. ज्यामध्ये अस्पृश्य व आदिवासीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीशी संबंधित एकूण ३७ प्रश्न होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माढ्यात नियंत्रणासाठी फडणवीस सरसावले

## नाराज उत्तम जानकरांना विशेष विमानाने मुंबईत पाचारण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माढा लोकसभा मतदारसंघातील नाराजी नाट्यातून ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या घराण्याने भाजपमधून बाहेर पडत थेट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश करून धैर्यशील मोहिते-पाटील हे भाजपच्या विरोधात तगडे आव्हान दिले आहे. या पार्श्वभूमीवर मोहिते-पाटील यांनी हाती घेतलेले बेरजेचे राजकारण पाहता जागे झालेल्या भाजपने आता माढ्यात नुकसान नियंत्रण करण्यासाठी हातपाय हलवायला सुरूवात केली आहे.**



त्याचाच भाग म्हणून पूर्वाश्रमीचे भाजपचे आणि आता मोहिते-पाटील यांना मैत्रीचा हात पुढे करण्यासाठी सरसावलेले उत्तम जानकर यांना विशेष विमान पाठवून मुंबईत पाचिरण केले आहे. जानकर यांची मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर त्यांना थेट नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घालून दिली जाणार असल्याचे जानकर यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले. उत्तम जानकर हे तसे पाहता मोहिते-पाटील यांचे पारंपारिक विरोधक असून गेल्या १५ वर्षात माळशिरस विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी मोहिते-पाटील गटाला झुंजविले होते. परंतु आता हेच जानकर भाजपवर नाराज असून त्यांनी भाजपवर फसवणुकीचा आरोप केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी मोहितै-पाटील यांच्याशी समझोत्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले आहे. जानकर यांनी माळशिरस राखीव विधानसभा तर मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा लढवावी आणि एकमेकांना मदत करण्याच्या अटीवर दोन्ही गट एकत्र येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. येत्या चार दिवसांत यावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची अपेक्षा आहे.माळशिरसमध्ये जानकर यांना मानणारे सुमारे ६० ते ७० हजार मतदार असल्याचे यापूर्वी लढविलेल्या विधानसभा लढतींतून दिसून येते. जानकर यांनी लोकसभा निवडणुकीत मोहिते-पाटील यांना साथ दिल्यास भाजपचे मोठे नुकसान होऊ शकते. या पार्श्वभूमीवर अखेर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी जागे होत उत्तम जानकर यांना मोहिते-पाटील यांच्या सोबत जाण्यासाठी रोखण्याचे प्रयत्न सुरू केले आहे. त्याचाच भाग म्हणून फडणवीस यांनी जानकर यांना मुंबईत सागर बंगल्यावर भेटीसाठी पाचारण केले आहे. त्यासाठी विशेष विमान पाठविण्यात येत आहे. हे विशेष विमान बारामती येथून मुंबईला जानकर यांना घेऊन जाणार आहे.नंतर लगेचच जानकर यांना नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीसाठी नेण्यात येणार आहे. या हालचालींना जानकर यांच्या निकटवर्तीयांनी दुजोरा दिला आहे. या भेटीतून जानकर यांना भाजपकडून विधान परिषदेचे सदस्य देण्याबरोबरच त्यांच्या अन्य अडचणी सोडवून 'अर्थ'पूर्ण समाधान केले जाऊ शकते, अशी माढ्यातील राजकीय वर्तुळात चर्चा आहेमैत्रीचा हात पुढे करण्यासाठी सरसावलेले उत्तम जानकर यांना विशेष विमान पाठवून मुंबईत पाचिरण केले आहे. जानकर यांची मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर त्यांना थेट नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घालून दिली जाणार असल्याचे जानकर यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले.

### जानकर यांना मानणारे मतदार

उत्तम जानकर हे तसे पाहता मोहिते-पाटील यांचे पारंपारिक विरोधक असून गेल्या १५ वर्षात माळशिरस विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी मोहिते-पाटील गटाला झुंजविले होते. परंतु आता हेच जानकर भाजपवर नाराज असून त्यांनी भाजपवर फसवणुकीचा आरोप केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी मोहितै-पाटील यांच्याशी समझोत्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले आहे. जानकर यांनी माळशिरस राखीव विधानसभा तर मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा लढवावी आणि एकमेकांना मदत करण्याच्या अटीवर दोन्ही गट एकत्र येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. येत्या चार दिवसांत यावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची अपेक्षा आहे. माळशिरसमध्ये जानकर यांना मानणारे सुमारे ६० ते ७० हजार मतदार असल्याचे यापूर्वी लढविलेल्या विधानसभा लढतींतून दिसून येते. जानकर यांनी लोकसभा निवडणुकीत मोहिते-पाटील यांना साथ दिल्यास भाजपचे मोठे नुकसान होऊ शकते. या पार्श्वभूमीवर अखेर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी जागे होत उत्तम जानकर यांना मोहिते-पाटील यांच्या सोबत जाण्यासाठी रोखण्याचे प्रयत्न सुरू केले आहे.


---

# बहुमत मिळाले तर आरक्षण रद्द होणार का?

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर केला जोरदार प्रहार

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज भंडारा-गोंदिया येथे महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारासाठी साकोली, भंडारा येथे सभा घेतली. या सभेत त्यांनी भाजपाच्या जाहीरनाम्यातील आश्वासन सांगितली, तर काँग्रेसवरही टीका केली. अमित शाह म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती आहे.**



आंबेडकरांनी संविधानाची निर्मिती करून देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले. आंबेडकरांनीच या देशाला विश्वात सर्वात चांगले असे संविधान दिले. काँग्रेस पक्ष आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने घरोघरी जाऊन मते मागत आहे. पण याच काँग्रेसने आंबेडकरांना निवडणुकीत पराभव करण्याचे काम केले." पुढे अमित शाह यांनी आरक्षणाचा उल्लेख करून काँग्रेसवर टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, "पाच दशक सत्ता असतानाही काँग्रेसने कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार दिला नाही. काँग्रेसने आंबेडकरांचा नेहमीच अपमान करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी निगडित पाच स्थानांना सन्मानित करण्याचा प्रयत्न भाजपाने केला. मात्र काँग्रेस पक्षाने खोटं-नाटं बोलून त्यांच्या विचारधारेला मातीमोल केले. भाजपाला ४०० हून अधिक जागा मिळाल्या तर भाजपा आरक्षणाला समाप्त करेल, असा अपप्रचार काँग्रेसकडून केला जातो."राहुल गांधी यांना मी सांगू इच्छितो की, आमच्याकडे दोन टर्म पूर्ण बहुमत असलेले सरकार आहे. पण आमच्या बहुमताचा उपयोग आरक्षण हटविण्यासाठी केला नाही. आम्ही बहुमताचा उपयोग कलम ३७० हटविण्यासाठी जरूर केला. आमच्या बहुमताचा उपयोग तिहेरी तलाक प्रथा रद्द करण्यासाठी केला. राहुल गांधींनी अपप्रचार करणे बंद करावे.

### आम्ही त्यांचे पक्ष फोडलेले नाहीत

मी आज याठिकाणाहून जाहीर करतो की, जोपर्यंत भाजपा आहे, तोपर्यंत आरक्षणाला धक्का लावणार नाही किंवा इतर कुणालाही धक्का लावू देणार नाही", असेही अमित शाह यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात एक नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी काँग्रेस आणि अर्धी उरलेली काँग्रेस पार्टी आहे, अशी टीका अमित शाह यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. या टीकेला उबाठा गट आणि शरद पवारांकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले होते. आज भंडारा येथे अमित शाह यांनी पुन्हा एकदा याच टीकेचा पुनरच्चार केला. "उद्धव ठाकरे आणि शरद पवार म्हणतात की, भाजपाने त्यांचा पक्ष फोडला. पण मी आज महाराष्ट्राला हे पुन्हा सांगू इच्छितो की, आम्ही त्यांचे पक्ष फोडलेले नाहीत. उद्धव ठाकरेंच्या पुत्रमोहामुळे शिवसेना पक्ष फुटला, शरद पवारांच्या लेकीप्रेमामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला. तसेच दुसऱ्या बाजूला विदर्भाचा एक नेता काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष झाला.

# भाजपाच्या जाहीरनामा जुमला पत्र!

## विरोधकांनी केली जाहिरनाम्यावर जोरदार टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणूक २०२४ साठी भाजपाने आज आपला जाहीरनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यावर विरोधकांनी जोरदार टीका केली आहे. हा जाहीरनामा फसवा आणि विश्वासाहार्य नाही, अशी टीका त्यांनी केली आहे. तसेच यात महागाई आणि बेरोजगारी यावर उपाययोजना करण्याचा साधा उल्लेखही करण्यात आलेला नाही,दर भाजपाने सदर जाहीरनाम्यात गरिब, युवा, शेतकरी आणि महिलांवर विशेष लक्ष दिल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले की, त्यांचे सरकरा समान नागरी कायदा आणि एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्यासाठी प्रयत्न करणार आहे.**

बेरोजगारी या प्रश्नांना जाहीरनाम्यात स्थान दिलेले नाही. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडले गेलेल्या या प्रश्नांची भाजपाला चर्चा करायची नाही. याउलट आमची योजना अतिशय स्पष्ट आहे. सरकार आल्यानंतर ३० लाख नोकरभरती करायची आणि प्रत्येक शिक्षित तरूणाला कायमची नोकरी प्रदान करायची. राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट टाकून जाहीरनाम्यावर आपली भूमिका मांडली आहे.राहुल गांधी पुढे म्हणाले, “यावेळी देशातील युवक पंतप्रधान मोदींच्या भुलथापांना बळी पडणार नाहीत. युवा शक्ती काँग्रेसचे हात बळकट करेल आणि ज्यामुळे देशात रोजगार क्रांती घडून येईल.”प्रियांका गांधी वाड्रा म्हणाल्या, लक्षात ठेवा, भाजपाने सुरुवातीपासून देश, समाज आणि लोकशाही विरोधात षडयंत्र रचलेले आहे. भाजपाचे नेते आधी तुमच्यासमोर




येतील संविधानाची शपथ घेतील आणि त्यानंतर रात्रीच्या अंधारात संविधान नष्ट करण्याची पटकथा रचतील. जर त्यांना सत्ता मिळाली तर संविधान सुरक्षित राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान या देशाचा आत्मा आहे. हा आत्मा जपण्यासाठी विरोधी पक्ष एकजुटीने भाजपाचा पराभव करण्यासाठी तयार आहे. आम आदमी पक्षाच्या नेत्या आणि दिल्लीच्या मंत्री आतिशी सिंह यांनीही भाजपाच्या जाहीरनाम्यावर टीका करत त्याला जुमला पत्र म्हटले. “आज देशात बेरोजगारीची मोठी समस्या असून लोक चिंतेत आहेत. “एलपीजी सिलिंडरचा दर ३०० वरून १२०० रुपयांवर गेला आहे. डिझेलचा दर प्रति लिटर ५५ रुपयांवरून ९० रुपयांवर गेला आहे. घरखर्च चालविण्यासाठी प्रत्येक कुटुंबाची होरपळ होत आहे. भाजपाच्या जुमला पत्रावर आता कोणचाही विश्वास उरलेला नाही”, अशी टीका आतिशी यांनी केली.बोलताना सांगितले की, भाजपने महागाई, बेरोजगारी या प्रश्नांना जाहीरनाम्यात स्थान दिलेले

### प्रत्येक कुटुंबाची होरपळ होत आहे

» राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट टाकून जाहीरनाम्यावर आपली भूमिका मांडली आहे.राहुल गांधी पुढे म्हणाले, “यावेळी देशातील युवक पंतप्रधान मोदींच्या भुलथापांना बळी पडणार नाहीत. युवा शक्ती काँग्रेसचे हात बळकट करेल आणि ज्यामुळे देशात रोजगार क्रांती घडून येईल.”प्रियांका गांधी वाड्रा म्हणाल्या, लक्षात ठेवा, भाजपाने सुरुवातीपासून देश, समाज आणि लोकशाही विरोधात षडयंत्र रचलेले आहे. भाजपाचे नेते आधी तुमच्यासमोर येतील संविधानाची शपथ घेतील आणि त्यानंतर रात्रीच्या अंधारात संविधान नष्ट करण्याची पटकथा रचतील. जर त्यांना सत्ता मिळाली तर संविधान सुरक्षित राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान या देशाचा आत्मा आहे. हा आत्मा जपण्यासाठी विरोधी पक्ष एकजुटीने भाजपाचा पराभव करण्यासाठी तयार आहे.आम आदमी पक्षाच्या नेत्या आणि दिल्लीच्या मंत्री आतिशी सिंह यांनीही भाजपाच्या जाहीरनाम्यावर टीका करत त्याला जुमला पत्र म्हटले. “आज देशात बेरोजगारीची मोठी समस्या असून लोक चिंतेत आहेत. “एलपीजी सिलिंडरचा दर ३०० वरून १२०० रुपयांवर गेला आहे. डिझेलचा दर प्रति लिटर ५५ रुपयांवरून ९० रुपयांवर गेला आहे. घरखर्च चालविण्यासाठी प्रत्येक कुटुंबाची होरपळ होत आहे.

नाही. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडले गेलेल्या या प्रश्नांची भाजपाला चर्चा करायची नाही. याउलट आमची योजना अतिशय स्पष्ट आहे. सरकार आल्यानंतर ३० लाख नोकरभरती करायची आणि प्रत्येक शिक्षित तरूणाला कायमची नोकरी प्रदान करायची.

# मुद्रा योजनेच्या कर्जाची मर्यादा २० लाख रुपयांपर्यंत!

## भारतीय जनता पक्षाचा जाहिरनामा प्रसिद्ध; मोठ्या घोषणा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आज (१४ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या उपस्थितीत दिल्लीमध्ये जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यामध्ये मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुद्रा योजनेच्या कर्जाची मर्यादा २० लाख रुपयांपर्यंत वाढवली, देशात नव्या बुलेट ट्रेन येणार, गरीबांसाठी आणखी तीन कोटी घरे, पीएम सूर्य घर योजना, लखपती दीदी योजना, नारी शक्तीचे सशक्तिककरण यासह आदी मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत.**

लहान व्यापारी आणि बांधकाम मजूरांचे सशक्तिककरण, ३ कोटी लखपती दीदी बनवण्याची गॅरंटी, ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब, सुरक्षित, समृद्ध भारत,




ऑलिम्पिकचे यजमानपद, शिक्षण, यासह आदी महत्वाचे मुद्दे भाजपाच्या जाहीरनाम्यात आहेत.पंतप्रधान आवास योजनेत दिव्यांगांना प्राधान्य दिले जाणार, जेनेरिक औषधांची केंद्र आणखी वाढवण्यात येणार, उज्वला योजनेची सबसिडी पुढील एका वर्षापर्यंत वाढविण्यात येणार, महिला खेळाडूंना विशेष सुविधा देणार, कोट्यवधी लोकांची वीजबील शून्य करण्यावर भर देण्यात येणार, कृषी क्षेत्रावर विशेष लक्ष, देशात फूड प्रोसेसिंग हब बनणार,महिला सक्षमीकरणासाठी प्राधान्य देण्यात येणार, ३ कोटी महिलांना लखपती करणार, मुद्रा योजना १० लाखांवरून २० लाखांपर्यंत वाढविण्यात येणार, नवी बुलेट ट्रेन उत्तर, दक्षिण पुर्व भारतात आणणार, वंदे भारतचे स्लीपर, चेअर, मेट्रो असे तीन प्रकार करण्यात येणार, मोफत रेशन योजना पुढील ५ वर्षे सुरु राहणार, अशा मोठ्या घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्या आहेत.गरिबांना परवडणारे पौष्टिक अन्न दिले जाणार, ७० वर्षावरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आयुष्मान योजनेचा लाभ, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार सुविधा मिळणार, मोफत रेशन

### मुद्रा योजना 20 लाखांपर्यंत

» यासह आदी महत्वाचे मुद्दे भाजपाच्या जाहीरनाम्यात आहेत.पंतप्रधान आवास योजनेत दिव्यांगांना प्राधान्य दिले जाणार, जेनेरिक औषधांची केंद्र आणखी वाढवण्यात येणार, उज्वला योजनेची सबसिडी पुढील एका वर्षापर्यंत वाढविण्यात येणार, महिला खेळाडूंना विशेष सुविधा देणार, कोट्यवधी लोकांची वीजबील शून्य करण्यावर भर देण्यात येणार, कृषी क्षेत्रावर विशेष लक्ष, देशात फूड प्रोसेसिंग हब बनणार,महिला सक्षमीकरणासाठी प्राधान्य देण्यात येणार, ३ कोटी महिलांना लखपती करणार, मुद्रा योजना १० लाखांवरून २० लाखांपर्यंत वाढविण्यात येणार, नवी बुलेट ट्रेन उत्तर, दक्षिण पुर्व भारतात आणणार.

योजना पुढील ५ वर्षे सुरू राहणार, गरीबांसाठी आणखी तीन कोटी घरे बांधणार, तृतीयपंथी समुदायाला आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळणार मोफत रेशन योजना पुढील ५ वर्षे सुरू राहणार, अशा मोठ्या घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्या आहेत.गरिबांना परवडणारे पौष्टिक अन्न दिले जाणार, ७० वर्षावरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आयुष्मान योजनेचा लाभ, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार सुविधा मिळणार, मोफत रेशन

योजना पुढील ५ वर्षे सुरू राहणार, गरीबांसाठी आणखी तीन कोटी घरे बांधणार, तृतीयपंथी समुदायाला आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळणार, घराघरांपर्यंत पाईपलाईनने गॅस पोहोचवणार, पीएम किसान योजनेचा लाभ पुढेही दहा कोटी शेतकऱ्यांना मिळणार, देशभरातील दुग्धव्यवसाय आणि सहकारी संस्थांची संख्या वाढवण्यात येणार, ग्रीन एनर्जी हब, फार्मा हब, इलेक्ट्रॉनिक हब निर्माण करणार, अशा घोषणा भाजपाकडून करण्यात आल्या आहेत.

# मुंबई इंडियन्सच्या मॅचसाठी वानखेडेवर पोहोचली देशमुखांची सून!

सध्या देशभरात IPL चा उत्साह पाहायला मिळत आहे. बहुतांश कलाकार मुंबईचे रहिवासी असल्याने हे सेलिब्रिटी अनेकदा मुंबई इंडियन्स संघाला सपोर्ट करण्यासाठी वानखेडेवर जातात. याआधी मराठी अभिनेता गौरव मोरे मॅच पाहण्यासाठी स्टेडियमला गेला होता. आता देशमुखांची लाडकी सून जिनिलीया आपल्या दोन मुलांसह मॅच पाहण्यासाठी गेली आहे. तिने शेअर केलेले फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आले आहे. आयपीएल २०२४ चा २९ वा सामना मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्ज या संघांमध्ये खेळवण्यात येत आहे. ही मॅच पाहण्यासाठी अभिनेत्री जिनिलीया देशमुख वानखेडेला गेली आहे. शेअर केलेल्या फोटोंमध्ये अभिनेत्री मुंबई इंडियन्स संघाला सपोर्ट करत असल्याचं पाहायला मिळत आहे.वानखेडेवर जिनिलीयाबरोबर तिची दोन्ही मुलं रियान आणि राहील उपस्थित असल्याचं पाहायला मिळत आहे. या दोघांनी मुंबई इंडियन्सची जर्सी परिधान करून हातात मुंबई संघाचे झेंडे पकडले आहे. जिनिलीयाने लाइव्ह मॅचदरम्यानचे काही क्षण आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत. दरम्यान, रितेश देशमुखचं संपूर्ण कुटुंब कायम चर्चेत असतं. जिनिलीया-रितेशच्या मुलांच्या संस्कारांचं सोशल मीडियावर नेहमीच कौतुक करण्यात




येतं. काही दिवसांपूर्वी हे संपूर्ण कुटुंब फुटबॉल मॅच पाहण्यासाठी परदेशात गेलं होतं. सध्या कामानिमित्त रितेश बाहेर असून जिनिलीया मुलांसह मॅचचा आनंद घेताना दिसली. याशिवाय अभिनेत्रीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर लवकरच ती आमिर खानबरोबर एका नव्या चित्रपटात झळकणार आहे.सध्या देशभरात IPL चा उत्साह पाहायला मिळत आहे. बहुतांश कलाकार मुंबईचे रहिवासी असल्याने हे सेलिब्रिटी अनेकदा मुंबई इंडियन्स संघाला सपोर्ट करण्यासाठी वानखेडेवर जातात. याआधी मराठी अभिनेता गौरव मोरे मॅच पाहण्यासाठी स्टेडियमला गेला होता. आता देशमुखांची लाडकी सून जिनिलीया आपल्या दोन मुलांसह मॅच पाहण्यासाठी गेली आहे. तिने शेअर केलेले फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आले आहे. आयपीएल २०२४ चा २९ वा सामना मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्ज या संघांमध्ये खेळवण्यात येत आहे.

## डिलीव्हरी बॉयची सोनू सूदने घेतली बाजू

बॉलीवूडचा अभिनेता सोनू सूद अभिनयाव्यतिरिक्त त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असतो. कोविडदरम्यान स्थलांतरीत मजुरांसाठी बसेसची व्यवस्था करून देण्यापासून ते अनेक सामाजिक कार्ये त्यानं केली होती. या मदतीच्या भावनेमुळे सोनू सूद प्रेक्षकांच्या नजरेत 'हीरो' बनला आहे. सोनू अनेक विषयांवर आपली मतं परखडपणे मांडत असतो. नुकत्याच व्हायरल झालेल्या डिलिव्हरी बॉयच्या व्हिडीओवरदेखील सोनूनं त्याची बाजू मांडत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.नामांकित कंपनीच्या डिलिव्हरी बॉयचा शूज चोरतानाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी विविध प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. अशातच सोनू सूदने त्याचे समर्थन करीत त्याच्यावर कारवाई न करण्याचा सल्ला दिला आहे.

## काजोलचा व्हिडीओ व्हायरल

बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे काजोल. काजोल आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर कित्येक वर्षं अधिराज्य गाजवत आहे. तिला अभिनयासाठी बरेच पुरस्कारही मिळाले आहेत. २०११ साली काजोलला 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आलं आहे. गेल्यावर्षी काजोलने ओटीटी क्षेत्रात पदार्पण केलं. 'लस्ट स्टोरीज २' या चित्रपटाच्या माध्यमातून काजोलने ओटीटी माध्यमांत पाऊल ठेवलं. त्यानंतर 'द ट्रायल' या वेब सीरिजमध्ये ती पाहायला मिळाली. आपल्या अभिनयाबरोबर सौंदर्याने चाहत्यांना भुरळ पाडणाऱ्या काजोलच्या मोबाइलच्या वॉलपेपरवर कोणाचा फोटो आहे? माहितीये का?नुकतीच काजोल लाल रंगाच्या साडीत दिसली. तिचे यादरम्यान अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. पण एका व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या व्हिडीओमध्ये काजोलच्या मोबाइलवरचा वॉलपेपर पाहायला मिळत आहे. काजोलच्या मोबाइल वॉलपेपरवर पती अजय देवगणचा फोटो नसून एका खास व्यक्तीचा फोटो आहे. ही व्यक्ती म्हणजे तिची लाडकी लेक. काजोलच्या मोबाइल वॉलपेपरवर न्यासा देवगणचा फोटो आहे. याचा व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.काजोलच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा पाऊस पडला आहे. कोणी काजोलच्या लाल रंगाच्या साडीतल्या लूकचं कौतुक करत आहे.



## सलमानच्या घराबाहेर गोळीबार

बॉलीवूड अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील घराबाहेर रविवारी पहाटे दोन अज्ञातांकडून गोळीबार करण्यात आला. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. सलमानच्या गॅलेक्सी अपार्टमेंट बाहेर पहाटे ४.५१ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर थोड्याच वेळात वांद्रे पोलीस, गुन्हे शाखा आणि पोलिसांच्या विविध टीम घटनास्थळी दाखल झाल्या. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज सुद्धा ताब्यात घेतलं आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू असतानाच घडल्याप्रकाराबद्दल सलमानचे वडील सलीम खान यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.आता सांगण्यासारखे काहीच नाही. कारण, असले प्रकार करून त्यांना फक्त प्रसिद्धीच्या (पब्लिसिटी) झोतात यायचं आहे. काळजी करण्याची आवश्यकता नाही." असं सलमानचे वडील सलीम खान यांनी 'सीएनएन न्यूज १८'शी संवाद सांगताना सांगितलं.सलमान खानचा जवळचा मित्र जफर सरेशवाला याने 'झूम'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की, "गोळीबार झाला तेव्हा सलमान त्याच्या घरीच उपस्थित होता. घडलेल्या घटनेने त्याचे कुटुंबीय अजिबात घाबरलेले नाहीत, सलीम खान मॉर्निंग वॉकसाठी देखील बाहेर पडले होते. भाईजानच्या घरात सर्वकाही ठीक आहे."सलमानच्या घरी अज्ञातांकडून गोळीबार करण्यात आल्यानंतर सध्या एक फेसबुक पोस्ट चर्चेत आली आहे. अनमोल बिश्नोई या अकाऊंटद्वारे या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे. परंतु, हे अकाऊंट फेसबुकवर सर्च केलं जाऊ शकत नाही.

## आलिया भट्ट-रणबीर कपूरच्या लग्नाला दोन वर्षे पूर्ण!

बॉलीवूडचे रोमँटीक कपल आलिया भट्ट आणि रणबीर कपूरने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घातली आहे. दोघांच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्याची नेहमी चर्चा रंगलेली असते. दोन वर्षांपूर्वी आलिया आणि रणबीर याच दिवशी लग्नबंधनात अडकले. आज त्यांच्या लग्नाला दोन वर्षं पूर्ण झाली आहेत. यादरम्यान त्यांच्या आयुष्यात राहाचं आगमन झालं आणि रणबीर-आलियाच्या लाडक्या लेकीमुळे कपूर कुटूंब पूर्ण झालं. लग्नाला दोन वर्ष झाल्याच्या निमित्ताने आलियाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास पोस्ट शेअर केली आहे. आलियाने तिचा आणि रणबीरचा ब्लॅक अँड व्हाईट क्लोज अप फोटो शेअर केला आहे. तर दुसऱ्या फोटोत डिझनीच्या 'अप' या चित्रपटातील पात्रांचा फोटो आलियाने शेअर केला आहे. ही दोन्ही पात्र आपल्या उतारवयात आलेली आहेत आणि खूप आनंदी आहेत. असं या फोटोत दिसतंय. "आपल्या दोघांना या दोन वर्षांच्या प्रवासासाठी खूप शुभेच्छा. या शुभेच्छा आजपासून ते अश्या अनेक वर्षांसाठी." असं कॅप्शन आलियाने या फोटोला दिलं.आलियाने शेअर केलेल्या या फोटोवर अनेक कलाकारांनी शुभेच्छा देत कमेंट्स केल्या आहेत. "तुम्हा दोघांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा" असं करिश्मा कपूरने लिहिलं. तर आयुष्मान खुरानाने रेड हार्टचा इमोजी कमेंट करत आपल्या शुभेच्छा दिल्या आहेत. मराठमोळे कलाकार सुकन्या माने, ऋतुजा बागवे अश्या अनेक कलाकारांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. दरम्यान रणबीर आणि आलियाच्या लव्हस्टोरीबद्दल सांगायचं झालं तर, अनेक वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर १४ एप्रिल २०२२ रोजी आलिया-रणबीरने लग्नगाठ बांधली. आलिया ११ वर्षांची असल्यापासूनच रणबीर कपूर तिला आवडत असल्याचं तिने एका मुलाखतीदरम्यान सांगितलं होतं.



# कोलकाताचा ऐतिहासिक विजय!

## लखनऊ सुपरजायंट्सचा 8 विकेट्सनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील २८वा सामना कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि लखनऊ सुपरजायंट्स (एलएसजी) यांच्यात ईडन गार्डन्सवर खेळला गेला आहे. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी ऐतिहासिक विजय नोंदवला. कारण हा आयपीएल इतिहासातील केकेआरचा लखनऊविरुद्ध पहिला विजय आहे. याआधी झालेल्या तीन सामन्यात लखनऊने कोलकातावर विजय मिळवला होता. लखनऊने प्रथम फलंदाजी करताना १६१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात कोलकाताने फिलिप साल्टच्या ८९ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर १५.४ षटकांत २ गडी गमावून सामना जिंकला.**




फिलिप सॉल्टने शानदार फलंदाजी करत कोलकाताकडून नाबाद ८९ धावा केल्या. ४७ चेंडूंचा सामना करताना त्याने १४ चौकार आणि ३ षटकार मारले. श्रेयस अय्यरने नाबाद ३८ धावा केल्या. त्याने ६ चौकार मारले. यादरम्यान लखनऊ सुपर जायंट्ससाठी मोहसीन खान हा यशस्वी गोलंदाज होता. या गोलंदाजाने ४ षटकात २९ धावा देत २ विकेट्स घेतल्या.कोलकाता संघाला गेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जकडूनपराभवाला सामोरे जावे लागले होते, मात्र घरच्या मैदानावर विजय मिळवत संघाने पुनरागमन केले. कोलकाताने आतापर्यंत पाच सामन्यांत केवळ एकच सामना गमावला आहे, तर चार सामने जिंकले आहेत. केकेआर आठ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर केएल राहुलच्या नेतृत्वाखालील लखनऊला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे हा संघ सहा सामन्यांत तीन विजय आणि तीन पराभवांसह सहा गुणांसह पाचव्या स्थानावर आहे.तत्पूर्वी, कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना केएल राहुलच्या नेतृत्वाखालील लखनऊ सुपर जायंट्सने २० षटकात ७ गडी गमावून १६१ धावा केल्या. वास्तविक, लखनऊ सुपर जायंट्सचे फलंदाज ठराविक अंतराने पॅव्हेलियनमध्ये परतत राहिले, त्यामुळे हा संघ मोठी धावसंख्या करण्यात अपयशी ठरला.लखनऊ सुपर जायंट्ससाठी निकोलस पुरनने ३२ चेंडूत ४५ धावा केल्या. तर केएल राहुलने २७ चेंडूत ३९ धावा केल्या. कोलकाता नाईट रायडर्सच्या गोलंदाजांबद्दल बोलायचे झाले तर मिचेल स्टार्क हा सर्वात यशस्वी गोलंदाज होता. या वेगवान गोलंदाजाने केएल राहुलच्या संघातील ३ फलंदाजांना आपला बाद केले. याशिवाय वैभव अरोरा, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि आंद्रे रसेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.आयपीएल २०२४ मधील २८वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि लखनऊ सुपरजायंट्स यांच्यात ईडन गार्डन्सवर खेळला गेला आहे.

### लखनऊवर 8 विकेट्सनी विजय

» या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी ऐतिहासिक विजय नोंदवला. कारण हा आयपीएल इतिहासातील केकेआरचा लखनऊविरुद्ध पहिला विजय आहे. आयपीएल २०२४ मधील २८वा सामना कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि लखनऊ सुपरजायंट्स (एलएसजी) यांच्यात ईडन गार्डन्सवर खेळला गेला आहे. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी ऐतिहासिक विजय नोंदवला. कारण हा आयपीएल इतिहासातील केकेआरचा लखनऊविरुद्ध पहिला विजय आहे. याआधी झालेल्या तीन सामन्यात लखनऊने कोलकातावर विजय मिळवला होता. प्रत्युत्तरात कोलकाताने फिलिप साल्टच्या ८९ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर १५.४ षटकांत २ गडी गमावून सामना जिंकला.

# पथिरानाच्या गोलंदाजीमुळे चेन्नईचा मुंबईवर विजय

## चेन्नईने मुंबईचा 20 धावांनी दणदणीत पराभव केला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्सच्या घरच्या मैदानावर चेन्नईने मुंबईचा २० धावांनी दणदणीत पराभव केला आहे. चेन्नईने दिलेल्या २०७ धावांचा लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईचा संघ ६ बाद १८६ धावाच करू शकला. मुंबईच्या पराभवामुळे रोहित शर्माचे झंझावती शतक व्यर्थ गेले. रोहित शर्मने ६१ चेंडूत १०० धावा केल्या. पण पाथिरानाच्या भेदक गोलंदाजीपुढे मुंबईचे इतर फलंदाज टिकू शकले नाहीत. पाथिरानाने शानदार गोलंदाजी करत चार षटकांत चार विकेट घेतले. सूर्यकुमार यादवला शून्यावर बाद करणं, ही चेन्नईसाठी महत्त्वाची गोष्ट ठरली.**




रोहित शर्मने शेवटच्या चेंडूपर्यंत फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला, पण चेन्नईचा संघ आणि पाथिरानाची गोलंदाजी मुंबईवर भारी पडली. धोनीच्या अखेरच्या षटकातील ३ षटकारांच्या जोरावर संघाने २०७ धावांचा आकडा गाठला. चेन्नईच्या डावात मुंबईसाठी शेवटचे षटक टाकण्यासाठी आलेल्या हार्दिकच्या षटकात एकूण २६ धावा झाल्या. यातील धोनीने सलग ३ षटकार मारले आणि शेवटच्या चेंडूवर 2 धावा केल्या. धोनीमुळेच चेन्नईला २०० धावांचा टप्पा पार करण्यात यश आले. हे शेवटचे षटक मुंबईसाठी चांगलेच भारी पडले. आयपीएल २०२४ मधील २९वा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात खेळला जात आहे. या सामन्यात महेंद्रसिंग धोनीने आपल्या फलंदाजीने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले. धोनीने मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याची शेवटच्या षटकात ज्या प्रकारे धुलाई केली, त्याचा आनंद सीएसकेच्या चाहत्यांनी वानखेडेवर घेतला. या सामन्यात धोनीला फलंदाजी करताना फक्त ४ चेंडू खेळायला मिळाले. ज्यावर धोनीने ५०० च्या स्ट्राईक रेटने २० धावा केल्या.चेन्नई सुपर किंग्जच्या डावातील शेवटच्या षटकात धोनी फलंदाजीला आला. डॅरिल मिशेलची विकेट पडताच धोनी फलंदाजीसाठी मैदानात पोहोचला. धोनीने येताच पहिल्याच चेंडूपासून आपली जादू दाखवायला सुरुवात केली. धोनीने वयाच्या ४२ व्या वर्षी ही कामगिरी केली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारखे स्टार फलंदाजही आयपीएलमध्ये आजपर्यंत अशी कामगिरी करू शकलेले नाहीत. त्याचबरोबर एमएस धोनीने आयपीएलमध्ये सीएसकेसाठी ५००० धावा पूर्ण केल्या आहेत. तो चेन्नई सुपर किंग्जसाठी ५००० धावा पूर्ण करणारा दुसरा खेळाडू ठरल आहे.

### चेन्नईची सुरुवात चांगली

» याआधी सुरेश रैनाने सीएसकेसाठी हा पराक्रम केला आहे. तसेच एमएस धोनी टी-२० फॉरमॅटमध्ये संघासाठी २५० किंवा त्याहून अधिक सामने खेळणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. प्रथम फलंदाजी सीएसकेने मुंबई इंडियन्सविरुद्ध २० षटकात ४ गडी गमावून २०६ धावा केल्या. या सामन्यात ऋतुराज गायकवाड आणि शिवम दुबे यांनी अर्धशतके झळकावली. चेन्नईची सुरुवात चांगली झाली नाही.